प्रेस नोट **दि. २८/०७/२०२६**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६

- राज्य शासनाने दि. ०२ जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ ही योजना जाहीर केली आहे.
- या योजनेमध्ये खालीलप्रमाणे तीन घटक आहेत

अ) कर्जमाफी :

कर्जवाटप दिनांक : ०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२५
थकबाकी दिनांक : ३०/०९/२०२५
कर्जबाकी दिनांक : ३१/०३/२०२६
कर्जमाफी रक्कम : रुपये दोन लाख

ब) एकवेळ समझोता योजना (OTS):

कर्जवाटप दिनांक : ०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२५
थकबाकी दिनांक : ३०/०९/२०२५
कर्जबाकी दिनांक : ३१/०३/२०२६
कर्जमाफी रक्कम : रुपये दोन लाखावरील रक्कम शेतक-याने बँकेत जमा केल्यानंतर कर्जमाफी रुपये दोन लाख

क) प्रोत्साहनपर लाभ : सन २०२२-२३, २०२३-२४ व दिनांक २०२४-२५ या आर्थिक वर्षापैकी कोणत्याही दोन वर्षी पीक कर्जाची उचल करुन विहित मुदतीत परतफेड आवश्यक तसेच सन २०२५-२६ मधील पीक कर्जाची विहित मुदतीत परतफेड करणा-या शेतक-यांना रुपये पन्नास हजार पर्यत अनुदान

- या योजनेमध्ये रुपये दोन लाखापेक्षा अधिक थकबाकी असणा-या शेतक-यांनी रुपये दोन लाखावरील रक्कम दि. ३१ मार्च २०२७ पर्यत बँकेत जमा करावयाची आहे.
- या योजनेमध्ये दि. ०१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत उचल केलेले पीक कर्ज तसेच पुनर्गठन / फेरपुनर्गठन केलेल्या पीक कर्जाचा समावेश आहे.
- त्याचप्रमाणे सदर पीक कर्ज तसेच पुनर्गठित / फेरपुनर्गठित कर्जाची दि. ३० सप्टेंबर २०२५ अखेरची थकबाकी जी दि. ३१ मार्च २०२६ पर्यत परतफेड झालेली नाही अशी रक्कम कर्ज माफीसाठी विचारात घेण्यात आली आहे.

- या योजनेची अंमलबजावणी महा-आयटी मार्फत विकसित केलेल्या संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात येत आहे. या प्रणालीवर बँकांनी एकूण ३१.१७ लाख कर्ज खात्याची माहिती सादर केली आहे. त्यामध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडील १०.०१ लाख व व्यापारी बँकाकडील २१.१६ लाख कर्जखात्यांचा समावेश आहे.
- शासनाने दि. ०९ जून २०२६ रोजी सर्व व्यापारी बँकांना पत्र देऊन अनुत्पादित वर्गवारीतील खात्यांना विशिष्ठ प्रमाणात सवलत (Haircut) देण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्याचप्रमाणे शासनाने दि. ०१ जुलै २०२६ रोजी सर्व बँकांना पत्र देऊन दि. ०१ एप्रिल २०२६ नंतर योजनेतंर्गत शेतक-यांच्या कर्जखात्यावर व्याजाची आकारणी न करण्याबाबत निर्देश दिले आहेत. शासनाने अनुत्पादित कर्जखात्यांबाबत बँकांनी खालीलप्रमाणे सवलत देण्याबाबत सूचित केले आहे.

अ.क्र	**अनुत्पादित कर्जाचा दिनांक**	**तडजोडीची रक्कम**
१	दि. ३०/०९/२०२१ किंवा त्यापूर्वी	अनुत्पादित तारखेस कर्ज खतावणीमधील कर्जबाकीच्या ३५ टक्के
२	दि. ०१/१०/२०२१ ते ३०/०९/२०२२	अनुत्पादित तारखेस कर्ज खतावणीमधील कर्जबाकीच्या ४५ टक्के
३	दि. ०१/१०/२०२२ ते ३०/०९/२०२३	अनुत्पादित तारखेस कर्ज खतावणीमधील कर्जबाकीच्या ५५ टक्के
४	दि. ०१/१०/२०२३ ते ३०/०९/२०२४	अनुत्पादित तारखेस कर्ज खतावणीमधील कर्जबाकीच्या ७० टक्के
५	दि. ०१/१०/२०२४ ते ३०/०९/२०२५	अनुत्पादित तारखेस कर्ज खतावणीमधील कर्जबाकीच्या ८५ टक्के

- बँकेमार्फत सादर केलेल्या कर्जखात्यांचे महा-आयटी मार्फत योजना निकषानुसार संगणकीय संस्करण तसेच वर नमुद केल्याप्रमाणे अनुत्पादित कर्ज खात्यांना सवलत देण्यात येऊन दि. २५ जुलै २०२६ रोजी एकूण १६.९६ लाख कर्जखात्यांची यादी आधार प्रमाणीकरणासाठी प्रसिध्द करण्यात आली आहे. यामध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडील ७.०३ लाख कर्जखाती व व्यापारी बँकांकडील ९.९३ लाख कर्जखात्यांचा समावेश आहे.
- प्रसिध्द करण्यात आलेल्या यादीमध्ये रुपये दोन लाखापर्यत थकबाकी असलेल्या कर्जखात्यांचा समावेश आहे. उर्वरित कर्जखात्यांचा समावेश त्याचप्रमाणे रुपये दोन लाखावरील कर्जखात्यांचा समावेश यानंतर प्रसिध्द होणा-या यादयांमध्ये करण्यात येणार आहे.
- आधार प्रमाणीकरणावेळेस शेतक-यास आधार क्रमांक, कर्ज खात्याचा क्रमांक तसेच कर्ज रक्कमेच्या अचूकतेबाबत तथा मान्यतेबाबत कार्यवाही करावयाची आहे.

- आधारप्रमाणीकरणासाठी प्रसिध्द केलेली यादी योजनेच्या प्रणालीवर, बँक शाखेमध्ये तसेच जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांचेकडे उपलब्ध असून सदरची यादी गावस्तरावर, बँक शाखा, विकास संस्था तसेच ग्रामपंचायत / चावडीवर प्रसिध्द करण्यात आली आहे. या यादीमध्ये शेतक-यांच्या नावांसमोर दिसणारी कर्जखात्यांची रक्कम तसेच आधार प्रमाणीकरणावेळी शेतक-यांस दिसणारी रक्कम वेगवेगळी असल्याने त्याबाबत स्पष्टीकरण देण्यात येत आहे.
- शेतक-यांनी बँकेच्या यादीतील रक्कम त्याचप्रमाणे प्रणालीवरील रक्कम पाहून आधारप्रमाणीकरण करावयाचे आहे. गावस्तरावर प्रसिध्द करण्यात आलेल्या यादीमध्ये दिसत असलेली रक्कम वर नमुद केल्याप्रमाणे अनुत्पादित कर्ज खात्यास निर्देशित प्रमाणात सवलत (Hair cut) आकारुन आलेली तडजोड रक्कम आहे. शासनाच्या निर्देशाप्रमाणे बँकांकडून दि. ०१/०४/२०२६ नंतर योजनेतंर्गत शेतक-यांच्या कर्ज खात्यावर व्याजाची आकारणी होणार नाही. त्यामुळे याबाबत स्पष्ट करण्यात येते की, दिनांक २५ जुलै २०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या यादीतील रुपये दोन लाखापर्यंतची रक्कम शासनामार्फत माफ करण्यात येणार आहे व शेतक-यांना कोणतीही रक्कम बँकेत भरावी लागणार नाही.
- दि. २८ जुलै २०२६ पर्यत ३.९६ लाखाहून अधिक शेतक-यांनी आधार प्रमाणीकरण केले आहे व प्रमाणीकरणाची प्रक्रिया सुरु आहे. आधार प्रमाणीकरणानंतर शेतक-यास द्यावयाच्या कर्जमाफीची रक्कम निश्चित होऊन सदर रक्कम थेट लाभ वितरण पध्दतीने शेतक-यांच्या कर्जखात्यात जमा करुन कर्ज खाते निरंक करण्यात येणार आहे. त्यानंतर शेतक-यांना नव्याने पीक कर्जाची उपलब्धता होणार आहे.

* * *